Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २०] गुरुवार, जुलै ९, २०२६/ आषाढ १८, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ-अमरावती विभागीय पुरवणी

———————

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

———————

भाग १-अ (असा.)(अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७०.

### नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रसिध्द मारेगाव नगर पंचायत क्षेत्राची प्रारूप विकास योजना मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये केलेल्या बदलाचे व नकाशाचे प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक प्रा.वि.यो.-मोरगांव-ससंनरय-४४४-२०२६.—

ज्याअर्थी, मारेगाव नगर पंचायतीने (यापुढे उक्त नियोजन प्राधिकरण असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्रमांक १, दिनांक १ जून, २०१८ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभाग, पुरवणी भाग १-अ मध्ये दिनांक २१ ते २७ जून, २०१८ रोजी प्रसिध्द केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन मारेगाव नगर पंचायतीने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांची “नगर रचना अधिकारी” म्हणून आदेश क्रमांक १४३२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ अन्वये नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी,उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ यांनी उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यासाठी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ अन्वये हस्तांतरीत केली आहे;

ज्याअर्थी, मारेगाव नगर पंचायतीने नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च कलम २६ (१) नुसार प्रारुप विकास मारेगाव (मु. ह.) दिनांक २८ डिसेंबर, २०२२ चे सूचनेव्दारे नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण प्राधिकृत प्रकाशन अमरावती विभागीय पुरवणी भाग एक-अ. मध्ये दिनांक ५ - ११ जून, २०२३ रोजी प्रसिध्द झाली आहे;

ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजना प्रसिध्दीकरणानंतर विहित मुदतीत प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) चे तरतुदीन्वये प्रदत्त अधिकारांचा वापर करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या आदेश क्रमांक १०८८ अन्वये तज्ञ सदस्यांची नेमणूक नियोजन समितीमध्ये केलेली आहे. त्यानुषंगाने नियुक्त नियोजन समितीने उक्त अधिनियमाचे कलम २८(३) चे तरतुदीन्वये मारेगाव नगर पंचायतीस सादर केलेल्या अहवालाच्या दिनांकापासून उक्त अधिनियमाचे कलम २८(४) चे तरतुदीन्वये विहित मुदतीत फेरबदल प्रसिद्धीकरण करणेस मारेगाव नगर पंचायत असमर्थ ठरले आहे;

आणि ज्याअर्थी, मा. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांचेकडील आदेश नं. ५३२, दिनांक २६ जून, २०२५ अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी व उक्त विकास योजना संदर्भाने कलम २८(४) व कलम ३० पर्यंत आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण करणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २१(४ अ) अन्वये, सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ यांची अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे;

ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने तो मान्य करुन व नव्याने बदल सुचवून, सादर केलेल्या नियोजन समितीच्या अनुषंगाने उक्त योजनेत उक्त अधिनियमाच्या कलम २१(४ अ) अन्वये, नियुक्त सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ "नगर रचना अधिकारी" तथा नियुक्त अधिकारी म्हणून नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती, तो मान्य करुन उक्त प्रारूप विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अंतर्गत फेरबदल / बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रशासकीय ठराव नं. १-२०२६, दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी पारित केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात / प्रारुप नकाशात केलेले फेरबदल / बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

आता, त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरण म्हणून या कार्यालयामार्फत उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेले फेरबदलांची सुची प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर दर्शवून नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे सदर फेरबदल / बदल निळ्या रंगाने उक्त प्रारूप विकास योजनेत दर्शविण्यात आले असून सदर नकाशा सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, यवतमाळ व मुख्याधिकारी, नगर पंचायत, मारेगाव, जि. यवतमाळ यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

**विकास योजना मारेगाव**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) खालील फेरबदल**

एम १ - मौजा मारेगाव, सर्वे नं. १४ (पै.) व १५ (पै.) या जमिनीवर प्रस्तावित केलेले आ. क्र. १० खेळाचे मैदान रद्द करुन त्या खालील जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यात येत असून ते विकास योजना नकाशावर दर्शविण्यात आले आहे.

**सर्वेश खु.चाफळे,**
नियुक्त अधिकारी, विकास योजना, मारेगाव
तथा
सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक ९ जुलै, २०२६.

भाग १-अ (असा.)(अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७१.

BY APPOINTED OFFICER AND ASSISTANT DIRECTOR, TOWN PLANNING

PUBLICATION OF DRAFT MODIFICATIONS/CHANGES IN DRAFT DEVELOPMENT PLAN OF NAGAR PANCHAYAT MAREGAON UNDER SECTION 28(*4*) OF MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966

*NOTICE*

No. R.D.P.-Maregon-ADTPY-444-2026.—

Whereas, the Maregaon Nagar Panchayat, (hereinafter referred to as "the said Planning Authority",) are *vide* Resolution No. 01, dated 1st June, 2018 has declared its intention to prepare a Draft Development Plan of Maregaon (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under us jurisdiction, (hereinafter referred to as the "said area") as per the provision of section 23(*1*) read with section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division Supplement Part 1A on dated 21st-27th June, 2018;

And whereas, in accordance with the provisions of Section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* order No.1432, dated 17th October, 2018 has appointed Assistant Director, Town Planning Branch, Yavatmal as " Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Branch Yavatmal has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on dated 26th December, 2022 for publication under section 26(*1*) of the said act, for inviting suggestions/objections from the public;

And whereas, Maregaon Nagar Panchayat, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Maregaon (Original Limit) U/S 26(*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 *vide* notice dated 28th December, 2022 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Amravati Division Supplement Part One-A, dated 5th-11th June, 2023;

And whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted U/S 28(*2*) of the said Act order of Hon. Director, Town Planning, Maharashtra State, Pune Order No.1088, dated 3rd March, 2023 has submitted its report to the said Planning Authority within time;

And whereas, the said Planning Authority has failed to publish the said Draft Development Plan under section 28(*4*) of the said Act within the time limit and whereas, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati by his order No 532 dated 26th June, 2025 has appointed Assistant Director, Town Planning, Branch, Yavatmal as an "Officer" as per the provisions of Sec. 21(*4A*) of the said Act, to exercise the powers of the said Planning Authority and complete the legal procedure required under section 28(*4*) & upto section 30 of the said Act;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Branch, Yavatmal being "Officer Appointed", has published the Draft Development Plan of Nagar Panchayat Maregaon U/S 28(*4*) of the Maharashtra Regional and Town Planning Act. 1966, *vide* notice for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Amravati Division, Supplement Part-A, dated 23rd January-29th January, 2025;

And whereas, after due consideration of the recommendations of the Planning Committee, the Planning Authority resolved to accept the modifications and alterations recommended therein, the said Officer, being Officer appointed has passed Resolution No. 01-2026, Dated 8th July, 2026 to publish the said Draft Development Plan U/S 28 (4) of the said Act, to make modifications/changes in the said Draft Published Plan and to submit the said Plan along with the said modification for sanction to the Government U/S 30 of the said Act:

And whereas, it is necessary to publish the said modifications/changes made in the said Draft Published Plan for inspection of the public as per section 28/4 of the said Act;

Now, therefore, the list of modifications made U/S 28/4 of the Act, by the said Planning Authority is hereby published as shown on the Draft Plan for information of the public. Also the said Draft Development Plan showing the said modifications in blue color is kept open for the inspection of the public in the office of Assistant Director, Town Planning, Yavatmal and Chief Officer, Nagar Panchayat, Maregaon, Dist. Yavatmal on working days, during office hours.

DEVELOPMENT PLAN MAREGAON NAGAR PANCHAYAT

MODIFICATION MADE UNDER SECTION 28(4) OF MRTP ACT, 1966 DETAILS OF MODIFICATIONS PROPOSED UNDER SECTION 28(4) OF MRTP ACT, 1966

M - 1. Site No. - "Garden" Proposed in Survey No.14 (Part) and 15 (Part) -Mauja -Maregaon is deleted and land there under is included in Residential Zone as shown on Plan.

SARVESH K. CHAFLE,
Officer Appointed for
Development Plan, Maregaon
and
Assistant Director, Town Planning, Yavatmal.

Yavatmal :
Dated the 9th July, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.